महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम

दूरध्वनी क्रमांक : 26470953
26472131/26474211 (विस्तार -2556)
फॅक्स क्रमांक : 26476749/26470953

नोंदणीकृत कार्यालय
प्लॉट नं. जी-9, प्रकाशगड,
प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051.

संदर्भ क्र.एससीआर-31/सा.मा./2798

दिनांक : 01.02.2012

# परिपत्रक (तात्काळ)

विषय : दिनांक 15 मार्च 2012 पासून मुंबई येथे सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी उपयुक्त साधार माहिती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाचे 2012 ह्या वर्षातील पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन दि. 15 मार्च 2012 पासून मुंबई येथे सुरु होणार आहे. सदर अधिवेशन कालावधीत विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांच्याकडून विचारण्यात आलेल्या प्रश्नांना मा. मंत्री (ऊर्जा), मा. राज्यमंत्री (ऊर्जा) आणि इतर शासकीय अधिकारी यांना महाराष्ट्र राज्यातील विद्युत परिस्थितीबाबत उत्तरे देण्यासाठी, शासनाच्या आदेशाप्रमाणे निरनिराळ्या प्रकारच्या माहितीसंबंधीचा साधार माहिती संच मंडळ सचिवालयामार्फत **दिनांक 28/02/2012** रोजी शासनास सादर करावयाचा आहे.

तरी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना अशी विनंती करण्यात येत आहे की, अद्ययावत माहितीच्या 60 मराठी आणि दोन इंग्रजी प्रती शासनास सादर करण्यासाठी **मंडळ विभागाकडे दिनांक 28/02/2012 पर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठविण्याची व्यवस्था करावी.** सदर माहिती वेळेवर न मिळाल्यास इतर विभागांची आलेली माहिती या विभागामार्फत एकत्रित करुन शासनास पाठविण्यात येईल. तसेच, **विलंबाने उपलब्ध झालेली माहिती शासनास पाठविण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची असेल.** शासनाच्या आदेशाप्रमाणे म.रा.वीज वितरण कंपनीतर्फे एकूण सर्व विभागांची माहिती एकत्रित संकलित करुन पाठविणे बंधनकारक असल्याने विभागप्रमुखांना त्यांच्या आधिपत्याखालील अधिकाऱ्यांना याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना देण्याची विनंती करण्यात येते.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | विभागाचे नाव |
|---|---|---|
| 1 | 2. | 3. |
| 1. | मुख्य अभियंता | वितरण /वाणिज्य /एपीडीआरपी/वीज खरेदी/ पायाभुत आराखडा |
| 2. | मुख्य महा व्यवस्थापक | वित्त व लेखा /सां.लेखा |
| 3. | मुख्य महा व्यवस्थापक | (तांत्रिक-आस्था.सामान्य)/ (मासं) |
| 4. | मुख्य अभियंता | वाणिज्य गुप्तचर विभाग (1/2/3) |
| 5. | संचालक | (द व सु) |
| 6. | व्यवस्थापक | (वित्त)/(भरती विभाग)/ (मपुक)/ (मावक) |
| 7. | अधीक्षक अभियंता | वीजदर नियामक कक्ष /वितरण विशेष प्रकल्प/ (वि.फ्रँचायसी)/राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना / अंतर्गत सुधारणा/भार व्यवस्थापन |

1. वरील माहितीची विवरणपत्रे ' ए - 4 ' आकाराच्याच कागदावर आणि एकाच बाजूस टंकलिखित केलेली असावी. विवरणपत्राच्या प्रत्येक पृष्ठाच्या वरील **उजव्या बाजूस पृष्ठ क्रमांक** देण्यात यावेत.

2. **साधार माहिती संचाचे मुखपृष्ठ हे सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे देण्यात यावे.**

3. मराठी भाषेच्या लेखनात एकरुपता राखण्यासाठी, शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयाचा माहितीकरीता व त्यानुसार टंकलिखित प्रतींकरीता कृपया प्रशासकीय परिपत्रक क्र.273 दि. 02.01.2010 चा आधार घेण्यात यावा.

4. विवरणपत्रांमध्ये दिलेली आकडेवारी, मंत्रीमहोदय विधानसभेत / विधानपरिषदेत सादर करणार असल्याने ही माहिती तंतोतंत, असंदिग्ध व सुवाच्य टंकलिखित केलेली आहे याची खात्री करुन घ्यावी अशी संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येत आहे.

कंपनी सचिव (प्रभारी)

प्रति,

1. संचालक (द व सु), म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
2. कार्यकारी संचालक, (प्रकल्प)/ (सांघिक नियोजन )/ (वाणिज्य)/ (मानव संसाधन), म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
3. मुख्य अभियंता, (वितरण)/(वाणिज्य)/(वीज खरेदी )/ (एपीडीआरपी)/(पायाभुत आराखडा), म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
4. मुख्य अभियंता, वाणिज्य गुप्तचर विभाग (1/2/3) म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
5. मुख्य महा व्यवस्थापक (मासं)/ (तांत्रिक आस्थापना)/ (वित्त लेखा) (सांघिक लेखा), म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
6. मुख्य चौकशी अधिकारी, म.रा.वि.वि. कं. लि.,धारावी मुंबई.
7. अधीक्षक अभियंता (वीजदर नियामक कक्ष)/ (राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना )/(अंतर्गत सुधारणा )/ (भार व्यवस्थापन )/(वितरण फ्रँचायसी)/ (वितरण विशेष प्रकल्प), म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
8. महाव्यवस्थापक (मासं) धारावी. म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
9. उप महाव्यवस्थापक (मासं - मा.व.कक्ष), धारावी. म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.
10. व्यवस्थापक (मासं-मा.व.क )/ भरती विभाग, म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.

प्रत सविनय सादर-

1. संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(वित्त) म.रा.वि.वि. कं. लि., मुंबई.

- 1 FEB 2012

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# 1. वितरण विभाग

## विधान मंडळाच्या अधिवेशनासाठी साधार माहिती

**(मार्च -2012)**

अनुक्रमणिका


वि- १ विद्युतीकरण केलेल्या कृषिपंपांची संख्या (------------------ रोजीची स्थिती) पृष्ठ क्र... ते ...

वि- २ कृषिपंपांच्या ऊर्जीकरणासाठी प्रतिक्षा यादी वर असलेल्या अर्जदारांची संख्या (------------------ रोजीची स्थिती) पृष्ठ क्र... ते ...

वि- ३ वाडयांच्या विद्युतीकरणाचा कार्यक्रम ----पर्यंत पृष्ठ क्र... ते ...

वि- ४ दलित वस्ती व आदीवासी गावांच्या विद्युतीकरणाबाबतची अधिक माहिती पृष्ठ क्र... ते ...

वि- ५ अनुसुचित जाती व जमाती करिता सवलतीच्या वीज पुरवठयाबाबत अधिक माहिती पृष्ठ क्र... ते ...

महा वितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(साधार माहितीच्या मुख पृष्ठाचा नमूना)

# वित्त विभाग

## विधान मंडळाच्या अधिवेशनासाठी साधार माहिती

**(मार्च - 2012)**

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| वित्त- १ स्थावर मालमत्ता | पृष्ठ क्र... ते ... |
| वित्त- २ कर्जाचा तपशील (---------------------पर्यंत) | पृष्ठ क्र... ते ... |
| वित्त- ३ महसुल प्राप्ती, महसूल खर्च व परतावा | पृष्ठ क्र... ते ... |